दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

■ आरएनआय : MAHMAR/2021/85884 शनिवार, दि. ११ एप्रिल, २०२६ ■ वर्ष - १ ■ अंक - १९६ ■ पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, नवमी रात्री १२-३८ पर्यंत, दिवस नक्षत्र – उत्तराषाढा दुपारी १-४० पर्यंत नंतर श्रवण
चंद्र रास - मकर, सूर्य रास - मीन, गुरु रास - मिथुन

### कन्हैया कुमारची केंद्रावर टीका

**जालना:** काँग्रेस नेते कन्हैया कुमार यांनी भाजपप्रणीत केंद्र सरकारवर लोकशाही संस्था कमकुवत केल्याचा आरोप करत जोरदार टीका केली. सर्वपक्षीय नेते डॉ. आंबेडकर यांना प्रतिकात्मक आदरांजली वाहतात, परंतु त्यांच्या शिकवणींचे पालन करण्यात अपयशी ठरतात. डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जालना येथे आयोजित व्याख्यानमालेत भारतीय लोकशाही आणि तिच्यापुढील आव्हाने, या विषयावर ते बोलत होते.

## सारांश वृत्त

### बस स्थानकाचा काही भाग कोसळला

**वडोदरा :** गुजरातच्या वडोदरा शहरात शुक्रवारी दुपारी बस स्थानकाचा काही भाग अंगावर कोसळल्याने एका ६० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. सायजीगंज भागातील मध्यवर्ती बस स्थानकाच्या वरच्या भागात प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) आणि इतर साहित्यापासून बनवलेली रचना दुपारी कोसळली, त्यामुळे खालील मोकळ्या मार्गात ढिगारा पडला.

### सहा महिन्यांत १० लाख पीएनजी जोडण्या

**अमरावती :** इस्रायल-अमेरिका-इराण संघर्षामुळे निर्माण झालेल्या स्वयंपाकाच्या गॅस पुरवठ्याच्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी पुढील सहा महिन्यांत १० लाख पीएनजी जोडण्या देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. देशांतर्गत गॅस पुरवठ्याचा आढावा घेताना, मुख्यमंत्र्यांनी तेल कंपन्या आणि अधिकाऱ्यांना, मोठ्या प्रमाणावर आयात होणाऱ्या द्रवीकृत नैसर्गिक वायूला पसंतीचा पर्याय म्हणून पाईपद्वारे नैसर्गिक वायूला प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले.

### अटल बस स्थानक योजनेची घोषणा

**भुवनेश्वर :** ओडिशा सरकारने शुक्रवारी राज्यभरात बसस्थानके उभारण्यासाठी अटल बसस्थानक योजनेची घोषणा केली असून, यासाठी सहा वर्षांच्या कालावधीकरिता ३,४०० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावित आधुनिक बसस्थानकांमध्ये डिजिटल माहिती प्रदर्शन फलक, स्वच्छ प्रतीक्षा कक्ष आणि व्यावसायिक जागा यांसारख्या सुविधा असतील.

### लाडकी बहीण योजनेवर कोर्टाचा सवाल; सरकारचा पुढचा डाव काय?

# उच्च न्यायालयाची झाप; सरकार माघार घेणार की लढा देणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व इतर लाभ देण्यासंदर्भात निधीअभावी अडथळे येत असल्याचा दावा राज्य सरकारकडून होत असताना, मुंबई उच्च न्यायालयाने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारकडे पैसे नसतील, तर 'लाडकी बहीण'सारख्या योजनांचा पुनर्विचार करावा, अशा कठोर शब्दांत न्यायालयाने फटकारले.

मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातील एका निवृत्त महिला कर्मचाऱ्याने सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व इतर लाभ न मिळाल्याने न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणीदरम्यान न्या. रवींद्र घुगे आणि न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठाने महापालिका आणि राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

याआधीच्या सुनावणीत महापालिकेने संबंधित महिलेला ३० मे २०२६ पर्यंत सहाव्या वेतन आयोगानुसार पेन्शन देण्याची तयारी दर्शवली होती. मात्र, सातव्या वेतन आयोगानुसार लाभ का दिले जात नाहीत, याबाबत न्यायालयाने स्पष्ट स्पष्टीकरण मागितले. त्यावर उपशिक्षणाधिकाऱ्यांचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले. यावर नाराजी व्यक्त करत न्यायालयाने, "भविष्यात चपराशाचे प्रतिज्ञापत्रही सादर कराल का?" असा उपरोधिक सवाल केला. पालिकेकडून सातव्या वेतन आयोगासाठी निधी उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. यासाठी राज्य सरकारकडून निधी मिळत नसल्याचे कारण देण्यात आले. यावर न्यायालयाने 'लाडकी बहीण' योजनेसाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च होत असताना, कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या पेन्शनसाठी पैसे कसे नाहीत, असा सवाल उपस्थित केला. सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, असे निर्देशही देण्यात आले. तसेच, न्यायालयाने पालिका प्रशासनालाही झापले. "अतिरिक्त आयुक्तांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळते, मात्र शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी पैसे नाहीत, हे कसे?" असा प्रश्न उपस्थित करत, "आठव्या वेतन आयोगाची वेळ आली असताना अजून सातवाच लागू केलेला नाही," असे निरीक्षण नोंदवले. कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन देण्यासाठी निधी नसेल, तर महापालिकेच्या कार्यालयातील टेबल, खुर्च्या, एसी विकावेत; आवश्यक असल्यास आयुक्तांच्या गाड्याही विकाव्यात, पण कर्मचाऱ्यांचे हक्काचे पैसे द्यावेत, अशा शब्दांत न्यायालयाने प्रशासनाला फटकारले.

न्यायालयाने अतिरिक्त आयुक्तांना या प्रकरणात सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले असून, राज्य सरकारलाही या याचिकेत प्रतिवादी करण्याची सूचना करण्यात आली आहे.

# विमान तिकिटांत २५ टक्के कपात?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इराण-अमेरिका तणावामुळे वाढलेल्या विमान इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर महाग झालेल्या विमान प्रवासाबाबत केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. देशभरातील विमानतळांवरील पार्किंग आणि लँडिंग शुल्कात २५ टक्क्यांनी कपात करण्याचे आदेश देत विमान कंपन्यांना दिलासा देण्यात आला आहे. या निर्णयाचा थेट फायदा प्रवाशांना मिळणार असून, देशांतर्गत विमान तिकिटांचे दरही कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून पश्चिम आशियातील तणावामुळे विमान इंधनाचे दर मोठ्या प्रमाणात वाढले होते. त्याचा परिणाम म्हणून विमान कंपन्यांनी तिकिटांचे दर वाढवले होते, ज्यामुळे प्रवाशांवर आर्थिक ताण वाढला होता. या पार्श्वभूमीवर केंद्राने हस्तक्षेप करत शुल्क कपातीचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार मुंबई, दिल्ली, पुणे यांसारख्या देशातील एकूण ३४ प्रमुख विमानतळांवर पार्किंग आणि लँडिंग शुल्कात कपात लागू होणार आहे. यामुळे विमान कंपन्यांवरील आर्थिक भार कमी होईल आणि त्याचा लाभ प्रवाशांपर्यंत पोहोचवण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. या निर्णयामुळे देशांतर्गत विमान तिकिटांचे दर २५ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतात. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसाठी हवाई प्रवास परवडणारा ठरणार आहे.

ही योजना प्रारंभी पुढील तीन महिन्यांसाठी लागू करण्यात येणार आहे. दरम्यान, पश्चिम आशियातील अस्थिरतेमुळे आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत दोन्ही मार्गांवरील विमान सेवांवर परिणाम झाला होता.

# सुनेत्रा पवारांच्या बॅनरवर शरद पवारांचा फोटो

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर निर्माण झालेल्या राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर बारामतीत पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी लावण्यात आलेल्या सुनेत्रा पवार यांच्या प्रचार बॅनरवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा फोटो झळकल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.


गेल्या तीन वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट पडलेले असताना, दोन्ही गटांमध्ये विलिनीकरणाच्या चर्चा सुरू होत्या. मात्र, काही कारणांमुळे अजित पवार यांनी माघार घेतल्याने हे विलिनीकरण सध्या थंड बस्त्यात गेले आहे. अशा परिस्थितीतही सुनेत्रा पवार यांच्या बॅनरवर शरद पवारांचा फोटो वापरण्यात आल्याने नव्या राजकीय समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, न्यायालयीन लढाई सुरू असताना अजित पवार यांच्या गटाने शरद पवार यांचा फोटो वापरू नये, असे स्पष्ट निर्देश असल्याचे सांगितले जाते. तरीही भाजप नेत्यांच्या रांगेत शरद पवारांचा फोटो दिसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

दरम्यान, तब्बल अडीच वर्षांनंतर पहिल्यांदाच अजित पवार यांच्या गटाकडून शरद पवार यांचा फोटो प्रचार बॅनरवर वापरण्यात आल्याने, दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येण्याच्या हालचाली सुरू आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### ऊर्जा तुटवडा हे राष्ट्रीय सुरक्षेचे आव्हान असल्याचा इशारा

# आयातीत तेलावरील अवलंबित्व हे मोठे संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** भारताची वाढती अर्थव्यवस्था आणि ऊर्जेची झपाट्याने वाढणारी गरज लक्षात घेता, देशासमोर केवळ ऊर्जा तुटवड्याचा प्रश्न नसून राष्ट्रीय सुरक्षेचे गंभीर आव्हान उभे ठाकले आहे, असा इशारा नीती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जी-२० शेर्पा अमिताभ कांत यांनी दिला आहे. आयातीत कच्च्या तेलावर असलेले भारताचे प्रचंड अवलंबित्व ही केवळ आर्थिक बाब नसून, ती धोरणात्मक आणि भू-राजकीय जोखमीशी संबंधित बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'ऊर्जा स्वातंत्र्य म्हणजेच खरे सार्वभौमत्व' असे ठामपणे नमूद करत कांत यांनी सरकारसमोर सात महत्त्वाच्या उपाययोजना मांडल्या आहेत. त्यानुसार, २०३० पर्यंत नवीकरणीय ऊर्जेची क्षमता सध्याच्या ५०० गिगावॅटवरून थेट १५०० गिगावॅटपर्यंत नेण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे. यामुळे पारंपरिक जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल. ऊर्जा साठवणूक ही भविष्यातील ऊर्जाव्यवस्थेची किल्ली ठरणार असल्याचे सांगत त्यांनी बॅटरी तंत्रज्ञान, पंप्ड हायड्रो प्रकल्प आणि ग्रीन हायड्रोजनसारख्या पर्यायांना मोठ्या प्रमाणावर चालना देण्याची गरज व्यक्त केली. ग्रीन हायड्रोजनच्या माध्यमातून भारताने निर्यातक्षम अर्थव्यवस्था उभारावी, असा सल्लाही त्यांनी दिला. वाहतूक क्षेत्रात होणारा इंधन वापर लक्षात घेता, इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार वाढवणे आणि इथेनॉल मिश्रण ३० टक्क्यांहून अधिक करण्याचे उद्दिष्ट गाठणे आवश्यक असल्याचे कांत यांनी नमूद केले. यामुळे कच्च्या तेलाच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येऊ शकते. याशिवाय, देशातील वीज ग्रीड आणि वहन पायाभूत सुविधा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. स्वच्छ ऊर्जा उत्पादनासाठी लागणाऱ्या उपकरणांमध्ये चीनवरील अवलंबित्व कमी करून देशांतर्गत उत्पादन वाढवणे हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थिती किंवा तणाव दीर्घकाळ टिकल्यास भारताचे आयात बिल प्रचंड वाढू शकते. हॉर्मुझच्या सामुद्रधुनीसारख्या महत्त्वाच्या मार्गांवर निर्माण होणाऱ्या अडथळ्यांमुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होतो आणि त्याचा थेट फटका भारतासारख्या आयात-आधारित देशांना बसतो. आयातीत जीवाश्म इंधनांवर अवलंबून राहणाऱ्या देशांना भू-राजकीय अस्थिरताही 'आयात' करावी लागते, असे नमूद करत त्यांनी स्पष्ट केले की, जो देश स्वच्छ ऊर्जा, साठवणूक आणि खनिज प्रक्रिया यामध्ये आत्मनिर्भर होईल, तोच देश भविष्यातील जागतिक संकटांना अधिक प्रभावीपणे तोंड देऊ शकेल.

### न्यायाधिकरणाच्या हस्तक्षेपाने ब्रिगेडियर पदोन्नतीचा मार्ग मोकळा

# कर्नल पुरोहित यांना मोठा दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** २००८ च्या मालेगाव स्फोट प्रकरणामुळे कारकिर्दीवर परिणाम झालेल्या लष्करी अधिकारी कर्नल श्रीकांत प्रसाद पुरोहित यांना जवळपास दोन दशकांनंतर मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या वर्षी निर्दोष मुक्तता मिळाल्यानंतर सशस्त्र दल न्यायाधिकरणाच्या हस्तक्षेपामुळे त्यांना ब्रिगेडियर पदावर पदोन्नतीसाठी मंजुरी मिळाली आहे.

२००८ मध्ये या प्रकरणात नाव समोर आले तेव्हा ते लेफ्टनंट कर्नल पदावर होते. खटल्याच्या प्रदीर्घ कालावधीत त्यांना टाइम स्केलनुसार कर्नल पदापर्यंत बढती मिळाली होती. सुमारे १७ वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर २०२५ मध्ये राष्ट्रीय तपास संस्थेच्या प्रकरणात विशेष न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली. ते ३१ मार्च २०२६ रोजी सेवानिवृत्त होणार होते; मात्र न्यायाधिकरणाने हस्तक्षेप करून त्यांच्या सेवानिवृत्तीला स्थगिती दिली. त्यामुळे त्यांची सेवा सुरू राहिली आणि पदोन्नतीच्या प्रक्रियेत त्यांचा विचार होऊ शकला.

पदोन्नती आणि संबंधित लाभांसाठी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायाधिकरणाने लष्कराला भूमिका स्पष्ट करण्यासाठी नोटीस बजावली होती. आपल्या आदेशात न्यायाधिकरणाने नमूद केले की, प्रथमदर्शनी असे दिसते की त्यांना बेकायदेशीर आणि बनावट पद्धतीने प्रकरणात गोवण्यात आल्यामुळे पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले होते, जे फौजदारी न्यायालयाच्या निर्दोष मुक्ततेतून स्पष्ट होते. ब्रिगेडियर पदासाठी मंजुरी मिळाल्यामुळे कर्नल पुरोहित यांची सेवा आता ३१ मार्च २०२८ पर्यंत वाढवण्यात आली आहे. कर्नल पदासाठी सेवानिवृत्तीचे वय ५४ वर्षे असताना ब्रिगेडियर पदासाठी ते ५६ वर्षे आहे. पदोन्नतीसाठी सेवेतील सातत्य ही महत्त्वाची अट असल्याने न्यायाधिकरणाचा हस्तक्षेप निर्णायक ठरल्याचे सूत्रांनी सांगितले.

दीर्घकाळ चालणाऱ्या फौजदारी खटल्यांमुळे लष्करासमोर निर्माण होणाऱ्या संस्थात्मक अडचणींवर या प्रकरणाने प्रकाश टाकला आहे. २०१७ मध्ये जामीन मिळाल्यानंतर ते सेवेत रुजू झाले होते, मात्र जुलै २०२० पर्यंत ते निलंबित होते.

### अवैध वाळू उत्खनन, तहसीलदार निलंबित

**छत्रपती संभाजीनगर :** हिंगोली जिल्ह्यातील एका तहसीलदाराला अवैध खाणकाम रोखण्यात निष्काळजीपणा केल्याच्या आरोपावरून निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती महसूल विभागाच्या अधिकाऱ्याने दिली. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ अन्वये वासमत तहसीलदार शारदा दळवी यांना निलंबित करण्याचा आदेश गुरुवारी जारी करण्यात आला, असे त्यांनी सांगितले. अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीतील निष्काळजीपणाबद्दल दळवी यांना निलंबित करण्यात आले आहे. दळवी यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात हजर राहण्यास सांगण्यात आले आहे.

# पंकजा मुंडे यांचा झंझावाती दौरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी पुण्यात झंझावाती दौरा करत विविध विकासकामांचा आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांनी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' प्रभावीपणे राबवण्यावर भर देत अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले. तसेच पशुसंवर्धन विभागाच्या वाहनांचे लोकार्पण आणि इंद्रायणी व पवना नद्यांतील प्रदूषणाची पाहणीही त्यांनी केली.

मुंडे यांनी अधिकाऱ्यांच्या बैठकीत योजनांची अंमलबजावणी वेळेत आणि परिणामकारकरित्या करण्यावर भर दिला. लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवताना कोणतीही दिरंगाई होऊ नये, तसेच पारदर्शकतेला प्राधान्य द्यावे, असे निर्देश त्यांनी दिले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुदंडा, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील, दुग्ध व्यवसाय विकास आयुक्त प्रशांत मोहोड, बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे, सहसचिव निवृत्तीनाथ म्हाळे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

### विविध विषयांवर २५ स्वतंत्र जनहित याचिका केल्या दाखल

# सर्वोच्च न्यायालयाची वकिलाला फटकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** विविध विषयांवर २५ स्वतंत्र जनहित याचिका दाखल करणाऱ्या वकिलाला सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फटकारत, न्यायालयात धाव घेण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने याचिकाकर्ता वकील सचिन गुप्ता यांना आपल्या व्यवसायावर लक्ष केंद्रित करण्यास स्पष्टपणे सांगितले.

सुनावणीदरम्यान स्वतः हजर राहून गुप्ता यांनी त्यांच्या सर्व जनहित याचिका मागे घेण्याची विनंती केली. त्यावर न्यायालयाने त्यांना परवानगी देताना, भविष्यात अशा प्रकारे थेट न्यायालयात येण्याऐवजी आधी प्रशासनाशी संवाद साधण्याचे निर्देश दिले. सरन्यायाधीशांनी नमूद केले की, कायद्याचे ज्ञान असलेल्या व्यक्तीने समस्यांकडे विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून पाहावे आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्या बाबत माहिती देऊन उपाययोजना करण्याचा प्रयत्न करावा. जर प्रशासनाने कारवाई केली नाही, तरच न्यायालयाचा पर्याय वापरावा, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. गुप्ता यांनी दाखल केलेल्या याचिकांमध्ये विविध मागण्या करण्यात आल्या होत्या. देशात अधिकृत वापरासाठी एकसमान भाषा धोरण तयार करणे, दूरदर्शनवर कायदेविषयक कार्यक्रम सुरू करून जनजागृती वाढवणे, साबणांमध्ये वापरल्या जाणाऱ्या रसायनांसाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे, तसेच भिकारी आणि तृतीयपंथी व्यक्तींसारख्या वंचित घटकांच्या उन्नतीसाठी धोरण आखण्याची मागणी करण्यात आली होती. याआधी ९ मार्च रोजीही सर्वोच्च न्यायालयाने गुप्ता यांच्या पाच 'निरर्थक' जनहित याचिका फेटाळल्या होत्या. त्यातील एका याचिकेत कांदा आणि लसूणमध्ये 'तामसिक' ऊर्जा आहे का, यासाठी वैज्ञानिक अभ्यास करण्याची मागणी करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर सरन्यायाधीशांनी नाराजी व्यक्त करत "तुम्ही या याचिका मध्यरात्री तयार करता का?" असा सवाल उपस्थित केला होता. न्यायालयाने त्या याचिकांना "अस्पष्ट, निरर्थक आणि निराधार" असे संबोधत फेटाळून लावले होते. दारू आणि तंबाखू उत्पादनांमधील घटकांच्या नियमनासंबंधीच्या याचिकांचाही त्यात समावेश होता. सदर प्रकरणातून न्यायालयाने जनहित याचिकांचा जबाबदारीने आणि योग्य विचारांती वापर करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

# सरमा यांच्या विरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर :** आसामचे मुख्यमंत्री हिमांता बिस्वा सरमा यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याबाबत केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचे तीव्र पडसाद राज्यात उमटू लागले असून, त्याच्या निषेधार्थ नागपुरात युवक काँग्रेसने आक्रमक आंदोलन केले.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस आणि नागपूर शहर युवक काँग्रेसच्या वतीने देवडिया काँग्रेस भवन येथे शुक्रवारी आंदोलन करण्यात आले.

या वेळी संतप्त कार्यकर्त्यांनी 'दलितांचा अपमान करणाऱ्यांचा निषेध असो', 'भाजपचा मनुवाद हद्दपार करा' आणि 'संविधानावर हल्ला सहन करणार नाही' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी सरमा यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला तसेच त्यांच्या पुतळ्याचे दहन करण्याचाही प्रयत्न केला. युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी या वेळी काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांच्यावर झालेल्या कारवाईचाही निषेध केला.

सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांचा आवाज दडपण्यासाठी यंत्रणांचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप करत, हा लोकशाहीविरोधी प्रकार असल्याची टीका करण्यात आली.

दरम्यान, आंदोलनादरम्यान परिस्थिती तणावपूर्ण झाल्याने पोलिसांनी हस्तक्षेप करत अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. पोलिसांच्या या कारवाईनंतरही कार्यकर्त्यांचा रोष अधिकच वाढलेला पाहायला मिळाला.

## संपादकीय


# शांततेची जागा: अनुपस्थितीची किंमत



**जागतिक संघर्षांच्या काळात शांततेची भाषा बोलणाऱ्यांची किंमत वाढते. पण ती भाषा कोण बोलतो, यालाही तितकेच महत्त्व असते. भारत मागे आणि पाकिस्तान पुढे असे चित्र दिसू लागले, तर तो केवळ प्रतिमेचा नव्हे, तर धोरणात्मक अपयशाचा प्रश्न ठरतो.**

जागतिक राजकारणात एक नियम निर्विवाद आहे. शांततेची जागा रिकामी राहत नाही. कोणी ना कोणी ती व्यापतोच. प्रश्न इतकाच की, तो कोण? आणि आपण कुठे उभे आहोत? अलीकडील घडामोडी पाहिल्या, तर उत्तर अस्वस्थ करणारे आहे. भारत सावध आहे; पाकिस्तान सक्रिय आहे. आणि आंतरराष्ट्रीय पटलावर सक्रियतेलाच महत्त्व मिळते. हे चित्र अपघाती नाही; ते घडवले गेले आहे. पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानने स्वतःला संवादक म्हणून मांडण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. अमेरिकेसोबतचे संबंध, सौदी अरेबियाशी जवळीक आणि इस्लामिक जगतातील स्थान या सर्वांचा वापर करून इस्लामाबादने स्वतःसाठी एक कथानक उभे केले आहे. ते कितपत खरे आहे, हा वेगळा प्रश्न; पण कथानकच अनेकदा वास्तव घडवते. प्रश्न पाकिस्तानचा नाही; प्रश्न भारताचा आहे. भारताकडे क्षमता आहे, प्रतिमा आहे, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वीकारार्हता आहे. तरीही भारत या अवकाशात दिसत नाही. सावधगिरी आणि अनुपस्थिती यामधली रेषा फार पातळ असते. आणि ती ओलांडली, की सावधगिरीही निष्क्रियतेत रूपांतरित होते. भारताने संतुलन राखण्याचा मार्ग निवडला. कोणत्याही संघर्षात थेट उडी न घेणे, सर्व बाजूंशी संबंध राखणे, ही भूमिका तत्त्वतः योग्य आहे. पण सततचा तटस्थपणा कधीकधी अप्रासंगिकतेकडे नेतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात अनुपस्थिती हीसुद्धा एक भूमिका असते आणि ती बहुतेक वेळा नुकसानकारक ठरते. याउलट पाकिस्तानने आक्रमक प्रतिमा उभी केली आहे. स्वतःला मध्यस्थ म्हणून सादर करणे, संवादासाठी पुढाकार घेणे, आणि जागतिक चर्चेत स्वतःचा उल्लेख निर्माण करणे, ही रणनीती आहे. ती यशस्वी होईलच असे नाही; पण ती जागा निर्माण करते. आणि सध्या ती जागा पाकिस्तानने साधली आहे. यातील विरोधाभास स्पष्ट आहे. ज्या देशावर दीर्घकाळ अस्थिरतेचे आरोप झाले, तोच आज स्थैर्याचा संदेश देतो. पण आंतरराष्ट्रीय राजकारणात स्मृतीपेक्षा क्षण महत्त्वाचा असतो. जो पुढाकार घेतो, तोच चर्चेत राहतो. उर्वरित देश स्पष्टीकरण देत राहतात. भारतासाठी ही प्रतिमेची बाब नाही; तर ती धोरणाची कसोटी आहे. ‘जागतिक दक्षिणेचा आवाज’ होण्याची महत्त्वाकांक्षा आणि प्रत्यक्षातील अनुपस्थिती ही विसंगती दीर्घकाळ टिकत नाही. भूमिका स्पष्ट असावी लागते, आणि ती कृतीतून दिसावी लागते. मध्यस्थी ही केवळ करार घडवण्याची प्रक्रिया नाही; ती विश्वास निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. आणि विश्वास हा उपस्थितीतून निर्माण होतो. जो दिसतो, तोच ऐकला जातो. जो ऐकला जातो, तोच प्रभाव टाकतो. उर्वरित केवळ निरीक्षक राहतात. यात एक मोठा धडा दडलेला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात क्षमता पुरेशी नसते; इच्छाशक्ती आणि पुढाकार अधिक महत्त्वाचे असतात. जागा मिळत नाही; ती घेतली जाते. आणि जी जागा आपण घेत नाही, ती दुसरा कोणी तरी घेतोच. याशिवाय, शांततेच्या या अवकाशात कथानकांची लढाईही तितकीच महत्त्वाची असते. कोण संवाद साधतो, कोण पुढाकार घेतो, आणि कोण अनुपस्थित राहतो यावरच आंतरराष्ट्रीय प्रतिमा घडते. यात आणखी एक महत्त्वाचा पैलू दुर्लक्षित करता येत नाही. जागतिक शक्तिसंतुलन बदलत असताना ‘मिडल पॉवर्स’ना नव्या भूमिका मिळत आहेत. अशा वेळी भारताने केवळ आर्थिक किंवा सामरिक ताकदीवर अवलंबून न राहता राजनैतिक पुढाकार दाखवणे अपेक्षित होते. संवाद घडवून आणणे, विश्वास निर्माण करणे आणि संघर्ष कमी करण्यासाठी सक्रिय भूमिका घेणे—हीच खरी सॉफ्ट पॉवर असते. ती वापरली नाही, तर ती अस्तित्वात असूनही निरुपयोगी ठरते. प्रत्यक्ष हस्तक्षेपापेक्षा ‘दिसणे’ कधी कधी अधिक निर्णायक ठरते. आणि सध्या भारत दिसत नाही, हीच खरी समस्या आहे. आज प्रश्न पाकिस्तान पुढे गेला का, हा नाही. प्रश्न असा आहे की भारत मागे का राहिला? कारण आंतरराष्ट्रीय राजकारणात रिकामी जागा ही संधी असते आणि संधी गमावणे म्हणजे प्रभाव गमावणे. शांततेची जागा घेतली नाही, तर ती आपोआप हरवते.

# रोख मदत विरुद्ध रोजगार: विकासाचा गोंधळ



**» गरिबांना थेट आर्थिक मदत देणे आवश्यक आहे, याबद्दल मतभेद नाहीत. पण ही मदतच विकासाचे पर्याय बनू लागली, तर प्रश्न निर्माण होतो. रोख हस्तांतरणावर जास्तीचा भर दिला, तर अर्थव्यवस्थेची दिशा चुकण्याचा धोका वाढतो.**

रोख मदत ही सुलभ आहे. थेट खात्यात पैसे जातात, तात्काळ दिलासा मिळतो, आणि राजकीयदृष्ट्या त्याचे श्रेयही स्पष्ट दिसते. म्हणूनच ती लोकप्रिय आहे. पण हीच सुलभता जितकी आकर्षक, तितकीच धोकादायक आहे. कारण मदत जर रोजगाराची जागा घेऊ१ लागली, तर विकासाचा अर्थच बदलतो.

मदतीचा उद्देश स्पष्ट असतो, संकटात आधार देणे. पण जेव्हा हा आधारच कायमस्वरूपी आधार बनतो, तेव्हा तो आधार राहात नाही; तो सवय बनतो. आणि सवयीवर उभी राहिलेली अर्थव्यवस्था टिकाऊ नसते.

अर्थव्यवस्थेचा पाया उत्पादनावर आणि रोजगारावर उभा असतो. गुंतवणूक होते, उद्योग वाढतात, आणि त्यातून नोकऱ्या निर्माण होतात, हीच नैसर्गिक साखळी. पण ही साखळी तुटली, की तिची जागा रोख मदत घेते. आणि इथेच खरा गोंधळ सुरू होतो. यातून निर्माण होणारी स्थिती स्पष्ट आहे, ‘जॉबर्स’ वाढतात, ‘जॉब्स’ नाहीत. लोक काही प्रमाणात टिकून राहतात; पण अर्थव्यवस्थेच्या उत्पादनक्षम प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढत नाही. ही व्यवस्था वरवर स्थिर दिसते; पण तिचा पाया कमकुवत होत जातो.

राजकोषीय पातळीवर याचे परिणाम अधिक गंभीर असतात. रोख हस्तांतरणाचा खर्च सतत वाढतो. सुरुवातीला तो व्यवस्थापनीय वाटतो; पण उत्पादनक्षमतेत वाढ नसल्यास हा खर्च ओझे बनतो. आणि एकदा तो ओझा बनला, की विकासासाठी आवश्यक गुंतवणुकीवर गदा येते. याचा थेट परिणाम धोरणांवर होतो. पायाभूत सुविधा, शिक्षण, कौशल्यविकास या क्षेत्रांतील गुंतवणूक मागे पडते. कारण त्याचे परिणाम उशिरा दिसतात. उलट, रोख मदत तात्काळ परिणाम देते.

राजकारणाला तात्काळ परिणाम हवेत; अर्थव्यवस्थेला वेळ हवा असतो. या संघर्षात दीर्घकालीन विचार बहुतेक वेळा हरतो. याशिवाय, या धोरणाचा सामाजिक परिणामही दुर्लक्षित करता येत नाही. जेव्हा उत्पन्नाचा स्रोत राज्यावर अवलंबून राहतो, तेव्हा स्वावलंबनाचा पाया कमकुवत होण्याचा धोका असतो. मदत आवश्यक आहे; पण ती कायमस्वरूपी उपाय बनली, तर ती प्रगतीला अडथळा ठरते.

रोख हस्तांतरणाच्या वाढत्या अवलंबित्वामुळे अर्थव्यवस्थेत एक शांत पण गंभीर बदल घडतो आहे. उत्पन्न मिळते, पण उत्पादकता वाढत नाही. खर्च होतो, पण मूल्यनिर्मिती होत नाही. ही तफावत वाढत गेली, तर वाढीचा वेग टिकेल; पण तिचा पाया कमकुवत होत जाईल, हेही तितकेच खरे.

यात आणखी एक गंभीर पैलू दुर्लक्षित राहतो, कामाच्या प्रतिष्ठेचा. जेव्हा अर्थव्यवस्था रोख मदतीवर अधिक अवलंबून राहते, तेव्हा ‘काम करून मिळवलेले उत्पन्न’ आणि ‘मिळालेली मदत’ यामधील फरक धूसर होऊ लागतो. दीर्घकालीन पातळीवर याचा परिणाम श्रमबाजारावर होतो. काम करण्याची प्रेरणा, कौशल्यविकासाची गरज आणि उत्पादकतेचा आग्रह यांमध्ये हळूहळू शिथिलता येऊ शकते. ही प्रक्रिया लगेच दिसत नाही; पण ती खोलवर परिणाम करते. काम ही केवळ आर्थिक क्रिया नसते; ती सामाजिक ओळख, आत्मसन्मान आणि स्थैर्य यांच्याशी जोडलेली असते. जर धोरणांनी हा दुवा कमकुवत केला, तर त्याची किंमत केवळ अर्थव्यवस्थेलाच नव्हे, तर समाजालाही मोजावी लागते.

याचा अर्थ रोख हस्तांतरण चुकीचे आहे का? नाही. ते आवश्यक आहे, विशेषतः असमानतेच्या काळात. पण ते उपाय नाही; ते तात्पुरते साधन आहे. हा फरक पुसला, की धोरणे दिशाहीन होतात. याशिवाय, या योजनांच्या राजकारणाकडेही दुर्लक्ष करता येत नाही.

थेट लाभ देणाऱ्या योजना मतदारांपर्यंत थेट पोहोचतात. त्यामुळे त्या अधिक आकर्षक ठरतात. पण आकर्षण आणि टिकाव यांचा संबंध नेहमीच थेट नसतो. जे सहज मिळते, ते टिकतेच असे नाही. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे उत्पादकतेचा प्रश्न. रोख मदत उपभोग वाढवते; पण उत्पादन वाढवत नाही. उपभोगावर उभी राहिलेली वाढ ही मर्यादित असते. उत्पादनक्षम गुंतवणूक नसेल, तर अर्थव्यवस्था एका मर्यादेनंतर थांबते. आणि त्या थांबण्याची किंमत पुन्हा बहुसंख्यांना मोजावी लागते. आज निवड स्पष्ट आहे. रोख मदतीवर चालणारी अर्थव्यवस्था की रोजगारावर उभी राहणारी अर्थव्यवस्था? रोख मदत जगवते; रोजगार घडवतो आणि अर्थव्यवस्था केवळ जगण्यासाठी नसते ती घडण्यासाठी असते.

# एम.ए. मराठी कर्मचाऱ्यांना विशेष वेतनवाढ

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या कामकाजात मराठी भाषेचा अधिकाधिक आणि प्रभावी वापर वाढवण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेच्या विधी समितीने एम.ए. मराठी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना दोन विशेष वेतनवाढ देण्याचा ठराव मंजूर केला असून, अंतिम मान्यतेसाठी तो महापालिका सभेसमोर मांडण्यात येणार आहे.



महापालिकेच्या दैनंदिन कामकाजात शंभर टक्के मराठीचा वापर व्हावा, तसेच प्रशासकीय व्यवहार अधिक सोपे, सुटसुटीत आणि अर्थपूर्ण व्हावेत, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या महापालिकेतील बहुतांश कामकाज मराठीत होत असले, तरी कार्यालयीन व्यवहार, सरकारी दस्तऐवज आणि संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी मराठीचा वापर वाढवण्यावर भर दिला जात आहे. विधी समितीची बैठक सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, कुशाग्र कदम, वर्षा जगताप, तुषार सहाणे, कुंदा भिसे, शेखर चिंचवडे यांच्यासह सहआयुक्त मनोज लोणकर आणि उपायुक्त राजेश आगळे उपस्थित होते. मराठी भाषा ज्ञान व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे, तसेच विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक अशा विविध क्षेत्रांमध्ये मराठी माध्यमातून उच्च शिक्षणाला चालना देणे, या दृष्टीने शासनाकडून विविध शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्याच अनुषंगाने महापालिकेच्या विधी समितीने हा ठराव मंजूर केला आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना मराठी विषयात उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळेल. तसेच लेखन, अनुवाद आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढून प्रशासन अधिक प्रभावी, सुलभ आणि नागरिकाभिमुख होण्यास मदत होणार आहे. “पालिकेच्या कामकाजात मराठीचा प्रभावी व व्यापक वापर व्हावा, हा आमचा उद्देश आहे. एम.ए. मराठी कर्मचाऱ्यांना विशेष वेतनवाढ देण्याच्या निर्णयामुळे उच्च शिक्षणाला चालना मिळेल. यामुळे प्रशासन अधिक सुलभ, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होईल,” असे सभापती सुजाता बोराटे यांनी सांगितले.

# ‘विचार प्रबोधन पर्व-२०२६’ची पूर्वतयारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या ‘विचार प्रबोधन पर्व-२०२६’ आणि सामाजिक समता सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी येथील कार्यक्रमस्थळांची पाहणी करण्यात आली. ११ एप्रिल ते १६ एप्रिल २०२६ या कालावधीत हा उपक्रम होणार आहे.

नगरसदस्य डॉ. सुनील कांबळे, विकास डोळस यांच्यासह महापालिका उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आणि विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी स्मारक परिसरातील तयारीचा आढावा घेतला. पाहणीदरम्यान कार्यक्रमस्थळी उभारण्यात आलेल्या सुविधा, स्वच्छता, प्रकाशयोजना, बसण्याची व्यवस्था, प्रवेशद्वार, वाहतूक नियंत्रण तसेच सुरक्षाव्यवस्था यांची तपासणी करण्यात आली. नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सोयीसुविधा योग्यरीत्या उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. या पर्वासाठी मोठ्या संख्येने नागरिक, अनुयायी आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व व्यवस्था सुस्थितीत ठेवण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. स्वच्छता, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा यांसारख्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# कुटुंब न्यायालयाची गरज तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** वेगाने विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात लोकसंख्येसोबतच कौटुंबिक वादांची संख्या झपाट्याने वाढत असताना, स्वतंत्र कुटुंब न्यायालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने पुणे येथे जावे लागत आहे. यामुळे वेळ, पैसा आणि श्रमाचा मोठा अपव्यय होत असून, विशेषतः महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

सध्या शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेली असून, औद्योगिक विकासामुळे विविध राज्यांतून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले आहे. परिणामी, सामाजिक संरचना अधिक गुंतागुंतीची बनली असून घटस्फोट, पोटगी, मुलांच्या पालकत्व हक्कांवरील वाद तसेच कौटुंबिक अत्याचाराच्या प्रकरणांत लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र, या सर्व प्रकरणांची सुनावणी पुण्यातील कुटुंब न्यायालयातच होत असल्याने पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना प्रत्येक तारखेला पुण्याला जावे लागते.

न्यायालयीन प्रक्रियेसाठी वारंवार प्रवास करणे अनेकांसाठी जिकिरीचे ठरत आहे. विशेषतः महिलांना आणि वयोवृद्धांना याचा अधिक त्रास सहन करावा लागतो. प्रवासाचा खर्च, वेळेची नासाडी आणि कामकाजावर होणारा परिणाम यामुळे अनेक प्रकरणे लांबणीवर पडत असल्याचे चित्र आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार न्यायव्यवस्थेच्या सुविधा वाढवणे अत्यावश्यक बनले आहे.

# ‘महापौर युवा संकल्प रोजगार केंद्र’सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोसरी :** रोजगाराच्या शोधात पिंपरी-चिंचवड आणि चाकणमध्ये येणाऱ्या युवकांची फसवणूक रोखण्यासाठी महत्त्वाचा उपक्रम राबवण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि बाबासाहेब लांडगे यांच्या पुढाकारातून ‘महापौर युवा संकल्प रोजगार, कौशल्य विकास व करिअर मार्गदर्शन केंद्र’ भोसरी आणि चाकण येथे सुरू करण्यात आले आहे.

भोसरीतील संविधान चौकाजवळील फुगे प्रायमा येथे या केंद्राचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विविध मान्यवर आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.



औद्योगिक नगरीत नोकरीच्या शोधात येणाऱ्या हजारो तरुण-तरुणींना योग्य मार्गदर्शनाअभावी आर्थिक फसवणुकीला सामोरे जावे लागते. अनेकदा नोकरीच्या नावाखाली मोठ्या रकमा उकळल्या जातात. ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि युवकांना विश्वासार्ह व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी हे केंद्र सुरू करण्यात आले आहे.

या केंद्रातून नोंदणी, नोकरीच्या संधी, राहण्याबाबत मार्गदर्शन तसेच करिअर समुपदेशन अशा सर्व सेवा पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे मागे पडणाऱ्या गरजू मुला-मुलींना याचा विशेष लाभ होणार आहे. आतापर्यंत सुमारे दोन हजार युवक-युवतींनी या उपक्रमाचा लाभ घेतल्याची माहिती देण्यात आली.

दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, इंजिनिअरिंग तसेच कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे. भोसरीतील फुगे प्रायमा (ए विंग, तिसरा मजला) तसेच चाकण येथील कॅपिटल स्क्वेअर येथे ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. “युवकांची फसवणूक थांबवणे आणि त्यांना शून्य खर्चात नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. तरुणांनी एकाही रुपयाचा खर्च न करता या उपक्रमाचा लाभ घ्यावा,” असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले. तसेच, विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी तरुणांना सन्मानाचे आयुष्य मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

## ५ मेगापिक्सेलच्या कॅमेऱ्यांमुळे कारवाईत अडथळे

# वाहतूक पोलिसांची 'ई-चलन' यंत्रणा व्हेंटिलेटरवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी सज्ज असलेली 'ई-चलन' यंत्रणा सध्या तांत्रिक अडचणींच्या गर्तेत अडकली आहे. वाहतूक पोलिसांना देण्यात आलेल्या ई-चलन मशिनमधील कॅमेऱ्यांची गुणवत्ता अत्यंत खालावल्याने प्रत्यक्ष कारवाई करताना पोलिसांची मोठी दमछाक होत आहे. फोटो धूसर येत असल्याने वाहनांचे नंबर प्लेट ओळखणे कठीण झाले असून, परिणामी नियम मोडणारे वाहनचालक पोलिसांच्या कचाट्यातून सहजरित्या सुटत असल्याचे



चित्र दिसत आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडे सध्या २२५ ई-चलन मशिन उपलब्ध आहेत. यामध्ये प्रामुख्याने 'अँड्रॉइड' आधारित मॉडेलचा वापर केला जातो. मात्र, या मशिनमध्ये केवळ ५ मेगापिक्सेलचा कालबाह्य कॅमेरा असल्याने लांबून घेतलेले फोटो किंवा धावत्या वाहनांचे फोटो 'मोशन ब्लर'मुळे अस्पष्ट येत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा कमी प्रकाशात या कॅमेऱ्यांची कार्यक्षमता शून्य ठरत आहे. काही दिवसांपूर्वी पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या खासगी मोबाईलवरून फोटो काढून दंड आकारल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. यानंतर प्रशासनाने पोलिसांना वैयक्तिक मोबाईल वापरण्यास मज्जाव केला आहे. आता केवळ सरकारी मशिनवरच विसंबून राहावे लागत असल्याने आणि या मशिनचे कॅमेरे निकामी असल्याने पोलिसांचे काम कमालीचे मंदावले आहे.

शहरातील आयटी पार्क, मुख्य चौक आणि वर्दळीच्या रस्त्यांवर भरधाव वाहनांवर कारवाई करणे अशक्य झाले आहे. त्यातच अनेक वाहनचालक जाणीवपूर्वक छोटे किंवा स्टायलिश फॉन्ट वापरून नंबर प्लेट लावतात. ई-चलनमधील ओसीआर (ऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन) प्रणालीला नंबर वाचण्यासाठी स्पष्ट फोटोची गरज असते. मात्र, कॅमेऱ्याचा ऑटो-फोकस व्यवस्थित नसल्याने ही प्रणाली अपयशी ठरत आहे.

"तांत्रिकदृष्ट्या ही यंत्रणा सक्षम वाटत असली, तरी प्रत्यक्ष रस्त्यावर कारवाई करताना ती कमकुवत ठरत आहे. धावत्या वाहनाचा नंबर प्लेट टिपणे सध्या जिकिरीचे झाले आहे," अशी भावना एका वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर व्यक्त केली. वाहतूक विभागाने आता उच्च रिझोल्यूशन, उत्तम लो-लाईट सेन्सर आणि जलद प्रोसेसिंग असलेल्या नवीन उपकरणांची मागणी केली आहे. जोपर्यंत अद्ययावत कॅमेरे असलेले तंत्रज्ञान पोलिसांच्या हाती येत नाही, तोपर्यंत शहरातील बेशिस्त वाहनचालकांवर वचक बसवणे कठीण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# उन्हाच्या तडाख्यात एसी बसला प्राधान्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांचा कल वातानुकूलित बसकडे झुकल्याचे चित्र दिसून येत आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळच्या एसी बसमधून १ ते ८ एप्रिल या कालावधीत दररोज सरासरी १० लाख ८२ हजार १८३ प्रवाशांनी प्रवास केल्याची नोंद झाली आहे.

शहरात सध्या तापमानाचा पारा ४० ते ४२ अंशांपर्यंत पोहोचला असून, दुपारच्या वेळेत प्रवास करणे नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. त्यामुळे प्रवासी सामान्य बसऐवजी एसी इलेक्ट्रिक बसची वाट पाहत असल्याचे चित्र बसस्थानकांवर दिसत आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवडसह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीत धावणाऱ्या पीएमपीच्या बससेवेवर नोकरी करणारे, महिला आणि विद्यार्थ्यांचा मोठा वर्ग अवलंबून आहे. पूर्वी डिझेल आणि सीएनजी बसवर भर असताना, गेल्या काही वर्षांत एसी इलेक्ट्रिक बस ताफ्यात दाखल झाल्याने प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

उन्हाचा वाढता तडाखा लक्षात घेता, प्रवासी एसी बसमधून प्रवास करण्याला प्राधान्य देत आहेत. परिणामी, या बसमध्ये क्षमतेपेक्षा अधिक गर्दी होत असल्याचेही दिसून येत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### एकाच रात्री दोन घरफोड्या

**भिगवण** : भिगवण पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांनी आपला मोर्चा वळवला असून, एकाच रात्री दोन ठिकाणी घरफोडी करून लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. म्हसोबाची वाडी येथील कवडे वस्ती आणि अकोले येथील गायकवाड वस्ती येथे या चोरीच्या घटना घडल्या आहेत. पहिल्या घटनेनुसार फिर्यादी नागेश बापूराव पवार हे म्हसोबाची वाडी येथे राहतात. गुरुवारी मध्यरात्री साडेबारा ते पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या दरवाजाची बाहेरून लावलेली कडी शिताफीने उघडली. घरात प्रवेश करून चोरट्याने लोखंडी कपाटातील ७४ हजार ४३९ रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. दुसऱ्या घटनेत अकोले येथील गायकवाड वस्ती येथे विशाल शिवाजी गायकवाड (वय २८) गुरुवारी पहाटे एक वाजण्याच्या सुमारास चोरट्याने घरात प्रवेश केला. एकूण २ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. भिगवण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### गावठी दारूच्या हातभट्टीवर छापा

**उरुळी कांचन** : शिंदवणे (ता. हवेली) हद्दीत बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या गावठी दारूच्या हातभट्टीवर उरुळी कांचन पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत एका महिलेला ताब्यात घेण्यात आले असून तिच्याकडून सुमारे १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई गुरुवारी सायंकाळी सातच्या सुमारास काळेशिवार परिसरातील राठोड वस्ती येथे करण्यात आली. रजनी संजय राठोड (वय ४३, रा. काळेशिवार, राठोड वस्ती, शिंदवणे) असे ताब्यात घेण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. महिला पोलीस शिपाई संध्या दादासो शिंदे यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी गावठी दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य, कच्चा माल आणि तयार दारू जप्त केली आहे.

## काढणीला वेग; आंबेगाव तालुक्यातील शेतकरी हतबल

# कांद्याचे भाव कोसळल्याने आर्थिक संकट



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या कांदा काढणीला वेग आला असताना बाजारभावात मोठी घसरण झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. उत्पादन खर्च वाढलेला असताना मिळणारे दर अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

सध्या गोळे कांद्याला १० किलोमागे १२० ते १२५ रुपये, साध्या कांद्याला ८० ते ११५ रुपये, गोटी कांद्याला ४० ते ७५ रुपये, तर बदला कांद्याला केवळ १५ ते ३५ रुपये दर मिळत आहे. या दरातून उत्पादन खर्चही निघत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी लोणी, धामणी, लाखणगाव, पोंदेवाडी आणि जारकरवाडी परिसरातील अनेक शेतकरी कांदा बाजारात विक्रीस न पाठवता चाळीत साठवून ठेवण्याचा पर्याय निवडत आहेत. इंधन दरवाढ, मजुरी, मशागत, खतं आणि औषधांच्या वाढलेल्या किंमतींमुळे यंदाचा उत्पादन खर्च गेल्या वर्षाच्या तुलनेत जवळपास दुप्पट झाला आहे. मात्र सध्याच्या बाजारभावामुळे हा खर्चही वसूल होत नसल्याने शेतकरी हताश झाला आहे. जानेवारी महिन्यात लागवड केलेल्या कांद्याची काढणी मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने बाजारात आवक वाढली आहे, त्याचबरोबर निर्यातबंदीचा परिणामही दरांवर होत असल्याचे शेतकरी सांगतात.

दरम्यान, काही बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या लिलावातही अनिश्चितता दिसून येत असून, व्यापाऱ्यांकडून कमी दरात खरेदी करण्याची प्रवृत्ती वाढल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. साठवणुकीची मर्यादित सुविधा, चाळींची कमतरता आणि हवामानातील चढ-उतार यामुळे साठवलेला कांदाही खराब होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर 'विकावे की साठवावे' असा पेच निर्माण झाला आहे. सध्या एकूणच शेतीमालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी वर्ग संकटात सापडला असून, शासनाने किमान कांद्याला हमीभाव द्यावा, अशी मागणी वाळूंजनगर येथील शेतकरी बाबाजी वाळूंज तसेच मांदळेवाडी येथील हनुमान आदक आणि फकीरा आदक यांनी केली आहे.

## पारगाव पुलाचे कठडे बसवले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातून जाणाऱ्या अष्टविनायक महामार्गावरील पारगाव गावठाणाजवळील घोड नदीवरील पुलाचे तुटलेले कठडे दुरुस्त करण्यात आल्याने स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे. काही दिवसांपूर्वी कठडे तुटल्यामुळे या मार्गावरील वाहतूक धोकादायक बनली होती आणि अपघाताची भीती निर्माण झाली होती.

या धोकादायक परिस्थितीची दखल घेत पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देत पाहणी केली. पुलाची स्थिती गंभीर असल्याचे लक्षात घेत त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, रात्रीच्या वेळी वाहनचालकांना धोका टाळण्यासाठी पुलाच्या दोन्ही बाजूंना रिफ्लेक्टर बसवण्याचे आदेश दिले. सूचनांनुसार, गुरुवारी सकाळीच पुलाच्या कडेला रिफ्लेक्टर बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले. त्यामुळे अंधारात किंवा धुक्यातही पुलाची कडा स्पष्ट दिसू लागली आहे. प्राथमिक सुरक्षेच्या उपाययोजना म्हणून रिफ्लेक्टर बसवण्यात आले असून, पुढील दोन ते तीन दिवसांत तुटलेल्या भागावर लोखंडी जाळी बसवण्यात येणार असल्याचे कांडगे यांनी सांगितले.

या तातडीच्या कारवाईमुळे दररोज या मार्गाने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाच्या जलद प्रतिसादाचे कौतुक केले असून, पुलाची सुरक्षितता पुन्हा पूर्ववत होत असल्याचे समाधान व्यक्त केले.

# वाढत्या उष्णतेने शेती कामे ठप्प



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात वाढत्या कडाक्याच्या उन्हामुळे जनजीवनावर मोठा परिणाम होत असून, शेती कामेही ठप्प होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. दि. १० एप्रिल रोजी परिसरात तापमानात लक्षणीय वाढ झाल्याने दुपारच्या वेळेत गावागावांत नागरिकांची वर्दळ कमी झाली आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे शेतकरी दुपारच्या वेळेत शेतात काम करण्याचे टाळत असून, सकाळी व सायंकाळीच शेतीची कामे करत आहेत. काही ठिकाणी शेतकरी डोक्यावर छत्री किंवा कापड घेऊनच काम करताना दिसत आहेत. वाढत्या उष्णतेमुळे बाजारपेठा आणि रस्तेही ओस पडले असून, सकाळी दहा वाजल्यापासूनच उन्हाचा चटका जाणवू लागतो. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागली आहे. विशेष म्हणजे, दि. १ एप्रिल रोजी काही ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली होती; मात्र त्यानंतर अवघ्या दोन-तीन दिवसांत तापमानात मोठी वाढ झाली.

उष्णतेच्या वाढत्या लाटेमुळे उष्माघातासारख्या आजारांचे प्रमाणही वाढू लागले आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर जाणे टाळण्याचा कल वाढला असून, प्रवासीही शक्यतो प्रवास टाळत आहेत. याचा परिणाम स्थानिक बाजारपेठांवर दिसून येत आहे. सकाळी व सायंकाळी काही प्रमाणात खरेदीसाठी गर्दी होत असली, तरी दुपारी दहा ते चार या वेळेत दुकाने ओस पडलेली दिसतात.

धामणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नागरिकांना सावधगिरीचा इशारा दिला आहे. उन्हात काम करताना डोक्यावर ओले कापड ठेवावे, थेट उन्हातून आल्यावर लगेच थंड पाणी पिऊ नये, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत.

# खेड तालुक्यात पोटनिवडणुकीची रणधुमाळी

## १३ ग्रामपंचायतींच्या १८ जागांसाठी मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर** : खेड तालुक्यातील १३ ग्रामपंचायतींमधील १८ रिक्त जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, नामनिर्देशन प्रक्रियेला वेग आला आहे. तहसीलदार कार्यालय परिसरात उमेदवार व समर्थकांची गर्दी वाढत असून निवडणुकीचे वातावरण रंगू लागले आहे.

७ एप्रिलपासून नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात झाली असून १३ एप्रिलपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहणार आहे. आतापर्यंत एकूण ८ उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याची माहिती तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली.

८ एप्रिल रोजी शेलगाव ग्रामपंचायतीच्या एका सर्वसाधारण महिला जागेसाठी एक अर्ज दाखल झाला. त्यानंतर ९ एप्रिल रोजी पिंपळाची मांजरेवाडी ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त महिला सरपंच पदासाठी एक अर्ज सादर करण्यात आला. येलवाडी ग्रामपंचायतीतील तीन रिक्त जागांसाठी चार अर्ज, तर बहुळ ग्रामपंचायतीतील दोन जागांसाठी दोन अर्ज दाखल झाले आहेत.

नामनिर्देशन पत्रांची छाननी १५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजल्यापासून केली जाणार आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत १७ एप्रिल दुपारी ३ वाजेपर्यंत असून, त्यानंतर उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप होणार आहे. मतदान २८ एप्रिल रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पार पडणार असून, मतमोजणीचे ठिकाण नंतर जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे यांनी दिली.

या पोटनिवडणुकीत निघोजे, भांबोली, वाडा, परसुल, वाघु, कोयाळी तर्फे वाडा, येलवाडी, शेलगाव, पिंपळगाव तर्फे खेड, बहुळ, साबळेवाडी, मांजरेवाडी आणि रोहकल या ग्रामपंचायतींमधील विविध प्रवर्गातील जागा रिक्त आहेत. यात सर्वसाधारण, महिला, अनुसूचित जाती व जमाती तसेच नामनिर्देशित जागांचा समावेश आहे.

ग्रामपंचायत पातळीवरील ही निवडणूक असल्याने स्थानिक पातळीवर चुरस वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक ठिकाणी इच्छुकांनी तयारी सुरू केली असून पुढील काही दिवसांत नामनिर्देशनांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

# ७७१ लाखांहून अधिक महसूल जमा

## राजगुरुनगर नगरपरिषदेची कर वसुली ५५.३५ टक्क्यांवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर** : राजगुरुनगर नगरपरिषदेने ३१ मार्च २०२६ अखेर मालमत्ता कर वसुलीत उल्लेखनीय कामगिरी करत एकूण ५५.३५ टक्के वसुली साध्य केली आहे. या कालावधीत नगरपरिषदेला तब्बल ७७१.३५ लाख रुपयांचा महसूल प्राप्त झाला असल्याची माहिती मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी दिली.

नगरपरिषदेच्या हद्दीत एकूण १७,९९७ मालमत्ता असून, थकीत मागणी ६६५.१७ लाख आणि चालू मागणी ७२७.९९ लाख अशी मिळून एकूण १३९३.१६ लाख रुपयांची कर मागणी होती. यापैकी थकीत वसुली ३९०.६५ लाख आणि चालू वसुली ३८०.७० लाख अशी एकूण ७७१.३५ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे.

कर वसुली वाढवण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने विविध स्तरांवर विशेष मोहिमा राबवल्या. मुख्याधिकारी गरकळ यांच्या मार्गदर्शनाखाली २५ पथके तयार करून सकाळ-संध्याकाळ घरोघरी जाऊन कर वसुली करण्यात आली. थकबाकीदारांना एसएमएसद्वारे सूचना देण्यात आल्या, तसेच सुमारे १५०० मालमत्ता धारकांना नोटिसा बजावण्यात आल्या.

महाराष्ट्र शासनाच्या 'अभय योजने'चा लाभ घेऊन नागरिकांना थकीत करावरील दंड व शास्तीत सूट देण्यात आली. या योजनेचा २५९१ मिळकत धारकांनी लाभ घेतल्यामुळे वसुलीला गती मिळाली. याशिवाय शहरात रिक्षाद्वारे प्रचार, सोशल मीडियावर जनजागृती आणि पोस्टर्सच्या माध्यमातून कर भरण्याचे आवाहन करण्यात आले. या सर्व प्रयत्नांमुळे मार्चअखेर कर वसुलीत समाधानकारक प्रगती साधता आली असून, उर्वरित थकबाकीदारांनी अभय योजनेचा लाभ घेऊन लवकरात लवकर कर भरण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## रांजणीत पारंपरिक कलेची धमाकेदार मेजवानी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील रांजणी येथे पीर साहेब महाराज यात्रा उत्सवानिमित्त तब्बल पंधरा वर्षांनंतर काळूबाळू लोकनाट्य तमाशा मंडळचा रंगतदार कार्यक्रम सादर करण्यात आला. पारंपरिक लोकनाट्य तमाशाची ओळख जपणाऱ्या या मंडळाने उत्कृष्ट सादरीकरणातून प्रेक्षकांची मनं जिंकली.

सांगली जिल्ह्यातील खाडे कुटुंबाची ही समृद्ध परंपरा सातू-हिरू कवलापूरकर यांच्यापासून सुरू झाली. त्यानंतर शिवा-संभा कवलापूरकर आणि पुढे रामचंद्र, शामराव, भीमराव, लहू उर्फ काळू आणि अंकुश उर्फ बाळू यांनी तमाशा कलेचा ठसा संपूर्ण महाराष्ट्रात उमटवला. आज या परंपरेची धुरा पाचवी पिढी सांभाळत असून, विजयकुमार खाडे, संभाजी खाडे, सुनील खाडे, अनुपकुमार खाडे, निळकंठेश्वर खाडे, आशिष खाडे, सुशांत खाडे, निलेशकुमार खाडे आणि वैभव खाडे हे कलावंत लोककला जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

यात्रोत्सवातील कार्यक्रमात गण, गवळण, मुजरा, विनोदी बतावणी आणि रंगबाजीचे सादरीकरण करून मंडळाने प्रेक्षकांना अक्षरशः खदखदून हसायला लावले. पारंपरिक पोशाख, लावणी आणि दमदार अभिनयामुळे कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पीर साहेब यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने खाडे कुटुंबातील सर्व कलावंतांचा मानाचा फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

दीर्घकाळानंतर झालेल्या या कार्यक्रमामुळे रांजणीसह परिसरातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. तमाशा पाहण्यासाठी आसपासच्या गावांमधूनही मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित होते.

# थोरांदळेतील खून-जबरी चोरी प्रकरणी दोघांना अटक; पाच गुन्ह्यांचा उलगडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे येथे ६२ वर्षीय दामोदर जयराम मिंडे यांच्या खून व जबरी चोरी प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखा आणि मंचर पोलीस ठाण्याच्या संयुक्त कारवाईत ही अटक करण्यात आली असून, आरोपींकडून खून, जबरी चोरी, दरोडा असे एकूण पाच गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, ३१ मार्च २०२६ रोजी थोरांदळे येथील पाईनमळा परिसरात मिंडे यांच्यावर त्यांच्या शेतातील घरात अज्ञात व्यक्तींनी लोखंडी वस्तूने हल्ला करून खून केला. त्यानंतर सोन्याची अंगठी, रोख रक्कम आणि मोबाईल असा सुमारे २९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला होता. या प्रकरणी त्यांच्या मुलगी गीतल गावडे यांनी फिर्याद दाखल केली होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीण पोलिसांनी तपासाची सूत्रे वेगाने हलवली. घटनास्थळाची पाहणी, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे दोन संशयितांची ओळख पटवण्यात आली.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणेवाडी परिसरात सापळा रचून कबीर उबऱ्या काळे (वय २४) याला अटक केली. त्याच्यासोबत असलेल्या एका विधीसंघर्षित बालकालाही ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून, गुन्ह्यात वापरण्यात आलेली पॅशन मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

आरोपी कबीर काळे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर पुणे ग्रामीण आणि अहमदनगर भागात दरोडा, जबरी चोरी व घरफोडीचे एकूण नऊ गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे. पुढील तपासात ओतूर, घोडेगाव, मंचर आणि दिंडोरी (जि. नाशिक) पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील आणखी चार गुन्हेही उघडकीस आले आहेत.

अटक आरोपींना न्यायालयात हजर केले असता ११ एप्रिल २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व मंचर पोलिसांनी केली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी दिली.

## आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाला जाग

# ओतूर ग्रामीण रुग्णालयाचे १ मे रोजी उद्घाटन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**ओतूर** : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे तब्बल १४ कोटी रुपयांहून अधिक खर्च करून उभारण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालयाच्या उद्घाटनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. येत्या १ मे रोजी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आंबिटकर यांच्या हस्ते या रुग्णालयाचे उद्घाटन करण्यात येणार असल्याची घोषणा आमदार शरददादा सोनवणे यांनी केली.

गेल्या दोन वर्षांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असलेली ही नवी इमारत धूळखात पडली होती. रुग्णालय सुरू करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. ओतूर येथील ज्येष्ठ नागरिक संघाने उपोषणाचा इशारा दिल्यानंतर प्रशासनाने तातडीने हालचाल केली. त्यानंतर झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत उद्घाटनाची तारीख जाहीर करण्यात आली असून आंदोलन मागे घेण्याचे आवाहनही करण्यात आले. आमदार सोनवणे यांनी सांगितले की, सध्या ३० खाटांचे असलेले हे रुग्णालय भविष्यात १०० खाटांपर्यंत विस्तारित करण्यात येणार आहे. तसेच येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्याचीही योजना आहे. माळशेज घाट परिसरात वारंवार होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर जखमींना पुणे किंवा मुंबई येथे हलवावे लागते. त्यामुळे वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी येतात. ही समस्या लक्षात घेऊन ओतूरमध्येच अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या रुग्णालयात सर्पदंश व वन्यप्राणी चावल्यावरील लस, अत्यावश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्यात येणार आहे. तसेच अखंड वीजपुरवठ्यासाठी जनरेटरची सुविधा करण्यात आली असून आपत्कालीन परिस्थितीत कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. या बैठकीस राज्य आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच स्थानिक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'माऊली सेवा प्रतिष्ठान'कडून त्या कुटुंबाला मदतीचा हात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील गावडेवाडी येथे राहणाऱ्या आदिवासी ठाकर समाजातील राहुल सिताराम खंडागळे यांच्या घराला लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाल्यानंतर माऊली सेवा प्रतिष्ठानतर्फे मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे.

या दुर्घटनेमुळे खंडागळे कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले असून त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. घटनेची माहिती मिळताच राजगुरूनगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठान तात्काळ मदतीसाठी पुढे सरसावले. प्रतिष्ठानच्या वतीने कुटुंबाला दोन महिने पुरेल इतका किराणा तसेच महिला, पुरुष आणि लहान मुलांसाठी आवश्यक कपड्यांचा संच देण्यात आला. याशिवाय राजगुरूनगर सहकारी बँकेचे संचालक गणेश थिगळे, रोहिणीताई थिगळे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी १० हजार रुपयांची आर्थिक मदत केली. तसेच गावडेवाडी ग्रामस्थांनीही पुढाकार घेत निधी संकलन करून मदत केली.

मदत वितरणाच्या वेळी गणेश थिगळे, रोहिणीताई थिगळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास दुधाळे, मुख्याध्यापक संजय घुमटकर, अविनाश पाटील, विकास थिगळे, राहुल थिगळे, योगेश शिंदे, दीपक मोरे, स्वप्नील जाधव आदी उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### व्हिसा-नोकरी रॅकेटचा पर्दाफाश

**जबलपूर:** मध्य नवी दिल्ली परदेशात नोकरी आणि व्हिसा सेवा देण्याच्या बहाण्याने लोकांची फसवणूक करणाऱ्या एका आंतरराज्यीय सायबर फसवणूक रॅकेटचा दिल्ली पोलिसांनी पर्दाफाश केला असून, या प्रकरणी तीन जणांना अटक केली आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली. आरोपींची नावे नंद किशोर प्रसाद, अहमद हयात खान आणि मुस्ताक खान अशी आहेत.

### उत्तर प्रदेशात १३.३९ कोटी मतदार

**लखनौ** : शुक्रवारी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीनुसार, विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) पूर्ण झाल्यानंतर उत्तर प्रदेशाची मतदार संख्या ८४ लाखांहून अधिक वाढून १३.३९ कोटी झाली आहे. येथील लोक भवन मीडिया सेंटरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना, उत्तर प्रदेशाचे मुख्य निवडणूक अधिकारी नवदीप रिनवा म्हणाले की, एसआयआर (SIR) मोहीम २७ ऑक्टोबर २०२५ ते १० एप्रिल २०२६ या कालावधीत राज्यभरातील सर्व ७५ जिल्हे, ४०३ विधानसभा मतदारसंघ आणि मतदान केंद्रांवर राबविण्यात आली. हा १६६ दिवसांचा उपक्रम ७५ जिल्हा निवडणूक अधिकारी (डीईओ), ४०३ मतदार नोंदणी अधिकारी (ईआरओ), १२,७५८ सहायक ईआरओ, १८,०२६ बीएलओ पर्यवेक्षक आणि १,७७,५१६ बूथ स्तर अधिकारी (बीएलओ) यांच्या योगदानाने पार पडला.

### बनावट नोटांसह एकाला अटक

**संभल (उत्तर प्रदेश)** : येथील हयात नगर परिसरात बनावट भारतीय चलनी नोटांसह एका ५० वर्षीय व्यक्तीला अटक करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. कारवाईदरम्यान त्याच्या ताब्यातून २०,००० रुपये किमतीचे बनावट भारतीय चलन जप्त करण्यात आले, ज्यामध्ये ५०० रुपयांच्या ३५ नोटा, २०० रुपयांच्या सहा नोटा आणि १०० रुपयांच्या १३ नोटांचा समावेश होता. बनावट चलन प्रसारित होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

## अमेरिका-इराण वाटाघाटींवर प्रश्नचिन्ह, पाकिस्तानात बंदोबस्त

# इस्लामाबाद चर्चांवर अनिश्चिततेचे सावट

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**इस्लामाबाद** : पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इराण यांच्यातील संभाव्य वाटाघाटींबाबत अनिश्चितता कायम असताना, पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद कडेकोट बंदोबस्ताखाली ठेवण्यात आली आहे. दोन आठवड्यांच्या नाजूक शस्त्रसंधीनंतर या चर्चांचे आयोजन करण्याची तयारी पाकिस्तान करत असला, तरी दोन्ही देशांकडून स्पष्ट संकेत न मिळाल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

तेहरान आणि वॉशिंग्टन यांच्यात मध्यस्थीची भूमिका बजावणाऱ्या पाकिस्तानने या शस्त्रसंधीचा विस्तार लेबनॉनपर्यंत लागू असल्याचा दावा केला होता; मात्र अमेरिका आणि इस्रायलने हा दावा फेटाळून लावला. त्यामुळे इस्लामाबादच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानने चर्चेसाठी येणाऱ्या प्रतिनिधी आणि पत्रकारांसाठी 'व्हिसा ऑन अरायव्हल' सुविधा जाहीर केली आहे. उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी सर्व विमान कंपन्यांना अशा प्रवाशांना व्हिसाशिवाय प्रवासाची परवानगी देण्याचे आवाहन केले असून, पाकिस्तानमध्ये पोहोचल्यावर त्यांना व्हिसा दिला जाईल, असे स्पष्ट केले.

दरम्यान, चर्चांच्या पार्श्वभूमीवर इस्लामाबादमध्ये 'रेड अलर्ट' जाहीर करण्यात आला आहे. सुमारे १०,००० हून अधिक पोलीस आणि सुरक्षा दल तैनात करण्यात आले असून, लष्कर, निमलष्करी रेंजर्स आणि स्थानिक पोलीस मिळून बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. सरकारी इमारती असलेल्या 'रेड झोन'मध्ये प्रवेश अत्यंत मर्यादित ठेवण्यात आला आहे.

अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हान्स संभाव्य चर्चांसाठी इस्लामाबादला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात असताना, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेल वाहतुकीबाबत टीका केली आहे. त्यांनी या संदर्भातील कराराच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित केले. इराणकडून या चर्चांबाबत विरोधाभासी संकेत मिळत आहेत. वरिष्ठ अधिकारी इस्लामाबादला रवाना झाल्याच्या वृत्तांना इराणच्या अधिकृत माध्यमांनी फेटाळले आहे. लेबनॉनमधील परिस्थिती स्थिर होईपर्यंत कोणत्याही चर्चेत सहभागी होणार नसल्याचेही इराणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनीही इस्रायलच्या लेबनॉनवरील हल्ल्यांमुळे शस्त्रसंधी धोक्यात आल्याचे नमूद करत अशा परिस्थितीत वाटाघाटी निष्फळ ठरतील, असे संकेत दिले. शस्त्रसंधीचे उल्लंघन आणि प्रादेशिक तणाव वाढल्यास चर्चांची शक्यता आणखी कमी होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांच्या इस्रायलविरोधी वक्तव्यांमुळेही तणाव वाढला असून, तेल अवीवकडून तीव्र प्रतिक्रिया नोंदवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानची मध्यस्थी भूमिका अधिकच गुंतागुंतीची बनली आहे. प्रतिनिधींच्या आगमनाबाबत अधिकृत पुष्टी न झाल्याने आणि विविध स्तरांवरून विरोधाभासी संकेत मिळत असल्याने, प्रस्तावित अमेरिका-इराण चर्चांभोवतीची अनिश्चितता अधिकच गडद होत आहे. या वाटाघाटींचा परिणाम पश्चिम आशियातील सुरक्षा, जागतिक ऊर्जा बाजारपेठ आणि आंतरराष्ट्रीय राजनैतिक समीकरणांवर दूरगामी ठरणार असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष इस्लामाबादकडे लागले आहे.

## महिला आरक्षणावर काँग्रेस आक्रमक



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : महिला आरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावित मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेचे "गंभीर परिणाम" होऊ शकतात, अशी चिंता काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी व्यक्त केली. या मुद्द्यावर सखोल चर्चा आवश्यक असून, विरोधी पक्षांसोबत एकजूट रणनीती आखण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या बैठकीत बोलताना खर्गे यांनी केंद्र सरकारवर राजकीय फायद्यासाठी घाईगडबडीत निर्णय घेतल्याचा आरोप केला. १६ एप्रिलपासून संसदेचे अधिवेशन बोलावण्यामागेही राजकीय हेतू असल्याचा दावा करत, हे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असल्याचे त्यांनी म्हटले. प्रस्तावित घटनादुरुस्ती आणि त्यासंबंधित बदल दूरगामी स्वरूपाचे असून, त्याचा देशाच्या निवडणूक प्रणालीवर मोठा परिणाम होऊ शकतो, असे खर्गे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या विषयावर व्यापक विचारविनिमय होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या बैठकीनंतर विरोधी पक्षांशी चर्चा करून एकत्रित रणनीती आखली जाईल आणि सर्वजण एकजुटीने पुढे जातील, असा ठाम इशाराही त्यांनी दिला.

खर्गे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला राहुल गांधी, प्रियंका गांधी वड्रा, केसी वेणुगोपाल, जयराम रमेश, सचिन पायलट यांच्यासह कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी उपस्थित होते.

# बंगालसाठी भाजपचा जाहीरनामा जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी आगामी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यावेळी त्यांनी सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर जोरदार टीका करत गेल्या १५ वर्षांचा कार्यकाळ राज्यासाठी घातक ठरल्याचा आरोप केला.

शाह म्हणाले की, तृणमूल काँग्रेसने २०१६ मध्ये खोट्या आश्वासनांच्या जोरावर सत्ता मिळवली आणि २०२१ मध्ये भ्रष्टाचार तसेच घुसखोरांशी साटेलोटे करून पुन्हा सत्तेत कायम राहिली. भाजपचा जाहीरनामा हा राज्यात बदल घडवून आणण्याचा ठोस आराखडा असल्याचा दावा त्यांनी केला. भाजप सरकार स्थापन झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत पश्चिम बंगालमध्ये समान नागरी संहिता लागू करण्यात येईल, असे आश्वासन शाह यांनी दिले. या धोरणामुळे सर्व नागरिकांसाठी समान कायदा लागू होईल आणि प्रत्येकाला आपल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

कल्याणकारी योजनांबाबत बोलताना त्यांनी जाहीर केले की, राज्यातील प्रत्येक महिलेच्या बँक खात्यात दरमहा ३,००० रुपये थेट जमा केले जातील. याशिवाय पोलीस दलासह सर्व सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे वचनही त्यांनी दिले.

भाजप सत्तेत आल्यास घुसखोरीबाबत शून्य-सहिष्णुतेचे धोरण अवलंबले जाईल. सीमा सुरक्षा अधिक मजबूत करण्यात येईल आणि जनावरांच्या तस्करीवर कठोर कारवाई केली जाईल. राज्यात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे सर्वोच्च प्राधान्य असेल, असेही त्यांनी अधोरेखित केले. सत्तेत आल्यानंतर ४५ दिवसांच्या आत सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# भाजपवर ममता बॅनर्जींचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : आसाम आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी शुक्रवारी भाजपवर जोरदार टीका केली. भाजप आसाममध्ये बाहेरचे लोक आणून मतांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करत असून स्थानिक मतदारांवर त्यांचा विश्वास नसल्याचा आरोप त्यांनी केला.

उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील तेंतुलिया येथे झालेल्या प्रचारसभेत बोलताना बॅनर्जी म्हणाल्या की, उत्तर प्रदेशमधून एका ट्रेनने सुमारे ५०,००० लोकांना आसाममध्ये आणण्यात आले. "सापावर विश्वास ठेवता येईल, पण भाजपवर नाही," असा टोला त्यांनी लगावला. देशातील विविध यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. केंद्रातील भाजप सरकारच्या काळात कोणतीही यंत्रणा तटस्थ राहिलेली नाही आणि सत्ताधारी पक्षाने त्या सर्वांना आपल्या प्रभावाखाली आणले आहे, असा आरोप त्यांनी केला. बंगालमध्येही भाजप अशीच रणनीती राबवण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा करत, मोठ्या प्रमाणावर अधिकारी बदल्या करण्यात आल्याचा उल्लेख त्यांनी केला. निवडणूक आयोगाने वेळापत्रक जाहीर केल्यानंतर राज्यातील अनेक पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

बॅनर्जी म्हणाल्या की, एसआयआर मोहिमेदरम्यान राज्यातील सुमारे ९० लाख नावे वगळण्यात आली. त्यापैकी ६० लाख हिंदू आणि ३० लाख मुस्लिम असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, आसाममधील एनआरसी प्रक्रियेत वगळलेल्या १९ लाख नावांपैकी १३ लाख हिंदू आणि ६ लाख मुस्लिम असल्याचेही त्यांनी नमूद केले. राज्यातील सर्व २९४ जागांवर स्वतःला उमेदवार मानावे, असे आवाहन करत त्यांनी मतदारांना थेट संदेश दिला. "जर माझ्या नेतृत्वाखालील सरकार हवे असेल, तर मला सर्व जागांवर उमेदवार समजा," असे त्या म्हणाल्या.

भाजप सत्तेत आल्यास राज्यातील खाद्यसंस्कृतीवर निर्बंध येतील, असा इशाराही त्यांनी दिला. पश्चिम बंगालमध्ये लोकांना त्यांच्या पसंतीचे अन्न खाण्याचे स्वातंत्र्य आहे, मात्र भाजपशासित राज्यांमध्ये तशी परिस्थिती नसल्याचा आरोप त्यांनी केला. बिहारमध्ये मासे खाण्यावर निर्बंध असल्याचा दावा करत त्यांनी टीका केली. याशिवाय, भाजपशासित राज्यांमध्ये पश्चिम बंगालमधील स्थलांतरित मजुरांवर अत्याचार होत असल्याचा आरोप करत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला.

# न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचा राजीनामा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : दिल्लीतील शासकीय निवासस्थानी नोटांची थप्पी आणि पोती सापडल्याच्या प्रकरणामुळे चर्चेत आलेले अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी राजीनामा राष्ट्रपतींकडे सादर केला असून, त्यांच्या विरोधात संसदेत सुरू असलेल्या महाभियोग प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे.

गेल्या वर्षी मार्च महिन्यात हे प्रकरण उघडकीस आले होते. दिल्लीतील त्यांच्या शासकीय निवासस्थानी लागलेल्या आगीदरम्यान घटनास्थळी दाखल झालेल्या अग्निशमन दलाच्या जवानांना मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आढळून आली होती. या नोटांचा काही भाग जळालेल्या अवस्थेत सापडला होता. या घटनेची गंभीर दखल घेत तत्कालीन सरन्यायाधीशांनी न्यायमूर्ती वर्मा यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली केली होती.

दरम्यान, न्यायमूर्ती वर्मा यांनी सर्व आरोप फेटाळून लावत आपल्या निवासस्थानी कोणतीही रोकड जप्त झालेली नसल्याचा दावा केला. संसदीय समितीसमोर स्पष्टीकरण देताना त्यांनी सांगितले की, आगीच्या वेळी ते घटनास्थळी उपस्थित नव्हते. संबंधित यंत्रणांकडून सुरक्षा राखण्यात त्रुटी राहिल्या असतील, तर त्यासाठी त्यांना जबाबदार धरता येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच, पोलिस आणि अग्निशमन दलाच्या कारवाईवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या तीन सदस्यीय समितीने न्यायमूर्ती वर्मा यांना पदावरून दूर करण्याची शिफारस केली होती.

## प्रस्तावावर व्यापक चर्चेची मागणी

# महिला आरक्षणावर माकपचा आक्षेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : विधिमंडळांमधील महिला आरक्षणासाठी प्रस्तावित कायदा आणि त्यास जोडलेल्या मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेवर केंद्र सरकारने व्यापक विचारविनिमय करावा, अशी मागणी सीपीआय(एम)ने शुक्रवारी केली. लोकसभेच्या जागांची संख्या ८१६ पर्यंत वाढवून त्यापैकी २७३ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याच्या प्रस्तावावर पक्षाने गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

सीपीआय(एम)च्या पॉलिटब्युरोने जारी केलेल्या निवेदनात संसद आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश आरक्षण देण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे स्पष्ट केले. मात्र, आरक्षणाला एकूण जागावाढ आणि मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडण्याच्या निर्णयावर त्यांनी आक्षेप घेतला. 'नारी शक्ती वंदन अधिनियम' अंतर्गत महिला आरक्षणाला जनगणना आणि सीमांकन प्रक्रियेशी जोडण्यास विरोध असूनही, तत्त्वतः या विधेयकाला पाठिंबा असल्याचेही पक्षाने नमूद केले.

यापूर्वी २००८ मध्ये यूपीए सरकारने आणलेल्या १०८ व्या घटनादुरुस्ती विधेयकाला दिलेल्या पाठिंब्याची आठवण करून देताना, त्या वेळीही पुनर्रचनेशी जोडल्यास महिलांना त्यांच्या हक्काच्या जागांपासून दीर्घकाळ वंचित राहावे लागेल, असा इशारा दिला होता, असे निवेदनात म्हटले आहे. या प्रक्रियेमुळे २०२४ आणि २०२९ च्या निवडणुकांमध्येही महिला आरक्षणाची अंमलबजावणी लांबणीवर पडू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली.

निवेदनात पुढे नमूद केले आहे की, दोन वर्षे उलटूनही केंद्राने आश्वासन दिल्याप्रमाणे ना जनगणना सुरू केली आहे, ना सीमांकन आयोगाची स्थापना केली आहे. विरोधकांच्या सर्वपक्षीय बैठकीच्या मागणीकडेही दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप पक्षाने केला आहे. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर असा प्रस्ताव मांडणे आक्षेपार्ह आणि अस्वीकार्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सीपीआय(एम)ने या प्रस्तावामागे निवडणूक फायद्याचा संकुचित राजकीय हेतू असल्याचा आरोप करत, जागावाढीच्या परिणामांवर सर्व पक्ष आणि राज्यांसोबत सखोल चर्चा करण्यासाठी हा निर्णय स्थगित करण्याची मागणी केली आहे.

२०११ च्या जनगणनेवर आधारित पुनर्रचनेशी महिला आरक्षण जोडल्याने अनेक तांत्रिक आणि राजकीय प्रश्न निर्माण होणार असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. केंद्र सरकारने २०२९ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण लागू करण्यासाठी हालचाली सुरू केल्याचे संकेत आहेत.

# तामिळनाडूत ख्रिश्चनांचा डीएमकेला पाठिंबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ख्रिश्चन अल्पसंख्याक प्रतिनिधींनी सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) आणि त्यांच्या आघाडीला पाठिंबा दर्शवला आहे. या भूमिकेमुळे अल्पसंख्याक समुदायांचा कल पुन्हा डीएमकेकडे असल्याचे संकेत मिळत आहेत.

सीएसआय झिऑन चर्चचे अध्यक्ष राजा फ्रीमन यांनी ख्रिस्ती समाज डीएमकेच्या पाठीशी ठामपणे उभा असल्याचे स्पष्ट केले. डीएमके सरकार पुन्हा सत्तेवर यावे, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याक समुदाय पक्षाला पाठिंबा देतील, असे सांगितले. राजकीयदृष्ट्या हा पाठिंबा महत्त्वाचा मानला जात आहे. तामिळनाडूत ख्रिश्चन आणि मुस्लिम मिळून सुमारे १५ टक्के मतदार आहेत आणि त्यांनी पारंपरिकरित्या डीएमकेच्या नेतृत्वाखालील आघाडीला पाठिंबा दिला आहे.

दरम्यान, अभिनेते-राजकारणी विजय आणि त्यांचा 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) पक्ष या मतदारांमध्ये आपले स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. चेन्नईतील चर्च नेत्यांशी संवाद साधत पक्षाने आपले जनसंपर्क प्रयत्न वाढवले आहेत. डीएमकेने प्रचाराला वेग दिला असून, मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन कोलाथूर मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांनी अलीकडेच चेन्नई मेट्रोने प्रवास करत प्रवाशांशी संवाद साधला आणि जनतेला पाठिंब्याचे आवाहन केले. उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनीही ट्रिप्लिकेन मतदारसंघात घरोघरी जाऊन प्रचार मोहीम राबवली आहे. भाजप, एआयएडीएमके आणि पीएमके यांसारख्या एनडीए घटक पक्षांच्या पाठिंब्याने एएमएमकेचे उमेदवार राजशेखरन यांनी तिरुचिरापल्ली पश्चिम मतदारसंघात प्रचार तीव्र केला आहे. तामिळनाडू निवडणुका २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात होणार असून, मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. मुख्य लढत डीएमकेच्या नेतृत्वाखालील सेक्युलर प्रोग्रेसिव्ह अलायन्स आणि एआयएडीएमकेच्या नेतृत्वाखालील एनडीए यांच्यात होण्याची शक्यता आहे. नवोदित टीव्हीके पक्षाच्या पदार्पणाकडेही राज्याच्या राजकारणात विशेष लक्ष लागले आहे.

## दोन शस्त्र तस्कर अटकेत

**रुद्रपूर** : जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी नेटवर्कशी संबंधित व्यक्तीला शस्त्रपुरवठा केल्याच्या आरोपावरून उधमसिंगनगर पोलिसांनी दोन आंतरराज्यीय अवैध शस्त्र विक्रेत्यांना अटक केली आहे. ही कारवाई सिडकुल फेज २ परिसरात शोध मोहिमेदरम्यान करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सितारगंजचा रहिवासी हरेंद्र सिंग उर्फ हनी आणि निखिल वर्मा उर्फ रानू (वय २७) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहेत.

## रशियाकडून पाकिस्तानला दिलासा बटाटा आयातीवरील बंदी उठवली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद** : आर्थिक संकट आणि परकीय चलन तुटवड्याशी झुंज देत असलेल्या पाकिस्तानसाठी रशियाकडून मोठी दिलासादायक बातमी समोर आली आहे.

रशियाने पाकिस्तानमधून बटाट्यांच्या आयातीवरील जुनी बंदी उठवली असून, ८ एप्रिलपासून पंजाब प्रांतातून जाणाऱ्या बटाट्यांच्या खेपांना रशियन बाजारपेठेत प्रवेशाची अधिकृत परवानगी मिळाली आहे.

या निर्णयामुळे पाकिस्तानच्या कृषी निर्यातीला मोठी चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः पंजाबमधील बटाटा उत्पादक शेतकऱ्यांना याचा थेट आर्थिक फायदा होणार असून, त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे. रशियाने घेतलेल्या या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील व्यापार संबंध अधिक मजबूत होण्याचे संकेत मिळत आहेत. सध्या आर्थिक अडचणींना सामोरे जाणाऱ्या पाकिस्तानसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरत असून, कृषी क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, या निर्णयानंतर पाकिस्तानकडून रशियात बटाट्यांची निर्यात वाढण्याची शक्यता असून, यामुळे देशाच्या परकीय चलन साठ्यातही भर पडण्यास मदत होणार आहे.

## असंवेदनशील तपासावर नाराजी, १३ एप्रिलला हजर राहण्याचे आदेश

# गाझियाबाद प्रकरणी पोलिसांना सर्वोच्च फटकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : चार वर्षांच्या मुलीवरील बलात्कार आणि हत्येच्या गाझियाबादमधील प्रकरणाच्या तपासात "असंवेदनशील दृष्टिकोन" दाखवल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी उत्तर प्रदेश पोलिसांना तीव्र फटकारले. न्यायालयाने पोलीस आयुक्तांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांना सर्व कागदपत्रांसह १३ एप्रिल रोजी वैयक्तिकरित्या हजर राहण्याचे आदेश दिले.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांच्यासह, या प्रकरणातील तपास पद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पीडितेच्या वडिलांच्या वतीने हजर असलेले ज्येष्ठ वकील एन. हरिहरन यांनी मांडलेल्या युक्तिवादाची दखल घेत, न्यायालयाने प्रकरणात न्यायालयीन देखरेखीखाली विशेष तपास पथक (एसआयटी) किंवा केंद्रीय यंत्रणेमार्फत कालमर्यादेत चौकशी करण्याची गरज व्यक्त केली.

खंडपीठाने नमूद केले की, या प्रकरणात दोन खाजगी रुग्णालये आणि स्थानिक पोलिसांनी दाखवलेली उदासीनता आणि असंवेदनशीलता अत्यंत धक्कादायक आहे. घटनेच्या दुसऱ्या दिवशी एफआयआर नोंदवण्यात आला, तर रक्तस्राव होत असलेल्या मुलीला रुग्णालयांनी दाखल करून घेण्यास नकार दिल्याचेही निदर्शनास आले.

शवविच्छेदन अहवालानुसार, मुलीच्या गुप्तांगात बोथट वस्तू घालण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. तपासादरम्यान पोलिसांनी सुरुवातीला प्रकरण केवळ खुनाचे मानल्याची बाबही न्यायालयाने गंभीर मानली. तसेच, लैंगिक अत्याचाराचा स्पष्ट संकेत असूनही एफआयआरमध्ये पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवला गेला नसल्यावरही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले. खंडपीठाने पोलिसांच्या कथित 'एन्काउंटर'च्या दाव्यावरही संशय व्यक्त केला. आरोपीला घटनास्थळी नेल्यानंतर त्याच्याकडे बंदूक कशी आली, असा सवाल न्यायालयाने उपस्थित करत तपासातील विसंगतींवर बोट ठेवले.

न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकार, संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी, दोन खाजगी रुग्णालये आणि कार्यकारी दंडाधिकारी यांना नोटीस बजावली आहे. तसेच, पीडितेच्या कुटुंबीयांना पोलिसांकडून त्रास दिला जाऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. घटनेच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने नमूद केले की, पीडितेच्या कुटुंबीयांना मानसिक आघातातून जात असताना त्यांच्यावर मारहाण करण्यात आली आणि त्यांना गप्प राहण्यास भाग पाडले गेले. ही बाबही अत्यंत गंभीर असल्याचे न्यायालयाने म्हटले.

१६ मार्च रोजी शेजाऱ्याने चॉकलेट देण्याच्या बहाण्याने मुलीला फसवून नेले होते. त्यानंतर ती रक्तबंबाळ आणि बेशुद्ध अवस्थेत आढळली. दोन खाजगी रुग्णालयांनी तिला दाखल करून घेण्यास नकार दिल्यानंतर, सरकारी रुग्णालयात तिला मृत घोषित करण्यात आले. या संपूर्ण घटनाक्रमावर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.